NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 36 ) 1st April 2011 ( No : 03

# M I N U T E S

## of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the* *27th February, 2011*

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 27th February, 2011 at Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati. Prof. B.T.Deshmukh, President was in the chair. The meeting was called to order at 12.00 noon. At the outset President welcomed members and announced that :-

(1) Since there is no coram as per provision of article 5 of the constitution of NUTA meeting is adjourned for half an hour and will meet at 12.30 of the clock.

(2) He further announced that due to conduct of Staff Selection Commission Examination by MPSC in this Hall, in the afternoon hours, the adjourned meeting will be held in the nearby Hall of Shri Shivaji Art's & Commerce College, Amravati.

The adjourned meeting of the General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.30 P.M. on Sunday, the 27th February, 2011 at Shri Shivaji Art's & Commerce College, Amravati. Prof. B.T.Deshmukh, President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0044, 0048, 0058, 0090, 0154, 0164, 0172, 0269, 0389, 0496, 0547, 0557, 0662, 0724, 0738, 0807, 1113, 1121, 1122, 1161, 1177, 1382, 1406, 1792, 1798, 1830, 1945, 1948, 2100, 2102, 2103, 2108, 2138, 2148, 2149, 2150, 2151, 2152, 2157, 2294, 2299, 2317, 2340, 2369, 2371, 2375, 2414, 2427, 2430, 2488, 2496, 2524, 2545, 2581, 2586, 2587, 2603, 2620, 2664, 2712, 2853, 2867, 2960, 2967, 2976, 2977, 2979, 3023, 3076, 3098, 3189, 3239, 3243, 3297, 3300, 3306, 3316, 3319, 3326, 3341, 3344, 3351, 3368, 3375, 3392, 3423, 3432, 3435, 3449, 3451, 3460, 3464, 3471, 3480, 3483, 3486, 3487, 3491, 3492 3494, 3495, 3498, 3518, 3519, 3523, 3527, 3550, 3573, 3594, 3619, 3621, 3631, 3632, 3659, 3661, 3667, 3706, 3750, 3784, 3797, 3816, 3835, 3852, 3853, 3856, 3876, 3890, 3952, 3992, 4019, 4076, 4097, 4132, 4134, 4138, 4149, 4150, 4152, 4173, 4189, 4200, 4245, 4251, 4257, 4275, 4279, 4280, 4335, 4336, 4337, 4411, 4490, 4499, 4562, 4584, 4588, 4599, 4629, 4630, 4637, 4645, 4691, 4691, 4782, 4845, 4846, 4861, 4879, 4880, 4885, 4896, 4897, 4898, 4904, 4953, 5019, 5046, 5119, 5157, 5215, 5220, 5221, 5242, 5260, 5263, 5264, 5265, 5284

Agenda of the General Body meeting was circulated on pages 01 to 09 & page 13 of 2011 NUTA Bulletin.

## ITEM NO. 526 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

(A) **CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 16 th May, 2010 at Shivshakti Arts & Commerce College, Babhulgaon ( Dist. Yavatmal )

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 57 to 62 of 2010 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 16 th May, 2010 at Shivshakti Arts & Commerce College, Babhulgaon ( Dist. Yavatmal )* ***vide No.CIM/29 Dated 25 th May, 2010 published on page 57 of 2010 NUTA Bulletin.*** *No correction was received.*

**विषय क्रमांक ५२६ (अ) :**
***प्राचार्य श्रीधर बाबुराव चिंचमलातपूरे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव***

प्राचार्य श्रीधर बाबुराव चिंचमलातपूरे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा. सुभाष गवई यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला**.:-

नुटा संघटनेचे माजी उपाध्यक्ष व अमरावती येथील भारतीय विद्या मंदिराचे विद्यमान अध्यक्ष माजी प्राचार्य श्री. श्रीधर बाबुराव चिंचमलातपूरे यांचे अकस्मात आजाराने दि. २५ फेब्रुवारी, २०११ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. भूगोल या विषयाचे प्राध्यापक म्हणून सुरुवातीला नाशिक येथे व त्यानंतर अमरावती येथील भारतीय महाविद्यालयात आपल्या व्यवसायाची सुरुवात करणाऱ्या प्राचार्य चिंचमलातपूरे यांनी पुढे मोर्शी व त्यानंतर अमरावती येथील भारतीय महाविद्यालयात प्राचार्य म्हणून उत्कृष्ट कार्य केले होते. प्रशासकीय सेवेचा उत्तम आदर्श निर्माण करुन उपलब्ध काळात महाविद्यालयाचा वेगाने विकास घडविण्याचे काम त्यांनी केले. भारतीय विद्या मंदिराचे संस्थापक सदस्य, नरहरी महाराज शिक्षण समितीचे अध्यक्ष, भारतीय गृह निर्माण संस्थेचे

**Nagpur University Teachers' Association**
**MEETING NOTICE : 1**
**DATED : 25.03.2011**

From :
**Prof. Dr. E. H. KATHALE**
Secretary, NUTA N-162, Reshim Bag,
Nagpur-444 009
To,
All the members of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near, Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.E. H. Kathale**,
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting :***
***12.00 Noon on Sunday, the***
***5 th June, 2011***

माजी अध्यक्ष या पदांवर काम करित असतांना या संस्थांच्या विकासामध्ये त्यांचे भरीव योगदान राहीले आहे. त्यांचा अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

नागपूर विद्यापीठ व अमरावती विद्यापीठाच्या विविध प्राधिकारीणावर त्यांनी काम केलेले होते. पुढे अमरावती विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सदस्य, समाजविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय व विद्यापीठाच्या विकासात भर घालणारे राहिले आहे.

नुटाचे आजीव सदस्य, पुढे कार्यकारिणीचे सदस्य, उपाध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनेच्या बांधणीसाठी दिलेले योगदान संघटनेच्या इतिहासात नोंद करण्यासारखे आहे. एमुफुक्टोच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून महाराष्ट्रभरातील संघटनेच्या सदस्यांना सक्रिय करण्यात व शिक्षकांच्या हिताच्या निर्णयासाठी त्यांनी दिलेले योगदान अतिशय महत्वपूर्ण राहीले आहे. प्राचार्य श्री. चिंचमलातपूरे यांच्या दुखःद निधनाने शैक्षणिक क्षेत्रात काम करणारा एक विद्यार्थीप्रिय शिक्षक, लोकप्रिय प्राचार्य, शैक्षणिक संस्थांसाठी काम करणारा उत्तम प्रशासक व व्यवस्थापक, विद्यापीठाच्या शैक्षणिक जीवनात उत्तम दृष्टी लाभल्यामुळे योगदान देणारा कर्तृत्ववान नेता, नुटा संघटनेमध्ये पूर्णपणे तादात्म्य पावून समरसतेने नेतृत्व करणारा लढवय्या आम्ही गमावलेला आहे. त्याच्या निधनाने या सर्व क्षेत्रांचे भरुन न निघणारे नुकसान झालेले आहे. प्राचार्य श्री. चिंचमलातपुरे यांच्या कुटुंबीयांवर ओढवलेल्या या दुःखामध्ये ही सभा सहभागी आहे.

**विषय क्रमांक ७२६ (ब) :**
***ॲड. पद्माकर चांदूरकर यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव***

ॲड. पद्माकर चांदूरकर यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ. अनिल ढगे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला**:-

ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. पद्माकर एन्. चांदूरकर यांचे ५ जून २०१० रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. ॲड. चांदूरकर यांनी प्राध्यापक म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात करुन नंतर उच्च न्यायालयात

## UNIVERSITY GRANTS COMMISSION : BAHADUR SHAH ZAFAR MARG
### *New Delhi 110 002 : F.No. 1-1/2002 (PS) pt file-III : 27 August 2009*

The Vice Chancellor,
(Central University, State University and Deemed to be University)

**Sub :** A) UGC (Minimum qualifications required for the appointment and career advancement of teachers in universities and institutions affiliated to it) 3rd amendment, Regulation, 2009.

B) UGC (Minimum standards and procedure for awards of M.Phil/Ph.D degree) Regulation 2009.

Sir/Madam

As you are aware that University Grants Commission framed the UGC (Minimum qualifications required for the appointment and career advancement of teachers in universities and institutions affiliated to it) (3rd amendment) Regulation, 2009 as well as the UGC (minimum standards and procedure for awards of M.Phil/Ph.D. Degree) Regulation, 2009, which were circulated vide Commission's earlier letter No. F.1-1/2002 (PS) Exemp. dated 12th June, 2009.

Now, the both the above mentioned Regulations have been published in the Gazette of India, no. 28 dated July 11 July 17, 2009 in Part III, Section 4. **Thus, both the UGC Regulations have come into force with their publication in the gazette of India.** A copy of both the above mentioned Regulations duly published in the Gazette of India is enclosed for information and necessary action.

This is to further inform you that in terms of the provisions of the UGC (minimum qualifications required for the appointment and career advancement of teachers in universities and institutions affiliated to it) (3rd amendment) Regulation, 2009, the commission has initiated the process of identifying candidates of various institutions, who have been awarded Ph.D. Degree in compliance of the provisions of the UGC (minimum standards and procedure for awards of M.Phil/Ph.D. Degree), Regulation, 2009, so as to exempt them from the requirement of minimum eligibility condition of NET/SLET for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in various universities, college and institutions.

However, since, the above process is likely to take time, therefore, keeping in view the public interest and the interest of students at large in expediting the filling up of various vacant positions of Assistant professor or equivalent positions in various universities, colleges and institutions, the Commission has decided, as an ad hoc measure, to leave it to the concerned universities, colleges and institutions to decade as to whether the Degree of Ph.D. awared to various candidates is in compliance of the provisions of UGC (Minimum standards and procedure for awards of M.Phil/Ph.D. Degree) Regulation, 2009, so as to exempt them from the requirement of minimum eligibility condition of NET/SLET for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in their universities, colleges and institutions.

It is also hereby clarified that where the admission at the M.Phil. has been through an entrance examination and course work has been prescribed at the M.Phil. level, such M.Phil. candidates when admitted to the Ph.D. programmes shall not be required to undertake entrance examination or course work and it shall be considered to have complied with the UGC (minimum standards and procedure for award M.Phil/Ph.D. Degree) Regulation, 2009 subject to the specific compliance of other requirements of the said Regulation and particularly the provisions as contained in Regulation 9 and Regulation 13 to 18 thereof.

In other cases, where a candidate has done M.Phil. from one university and moves to another university for Ph.D., the new university may give credit and exempt for the course work done in the previous university. However, such a candidate will have to appear in the entrance test as applicable to a fresh candidate directly joining Ph.D.

The above procedure will apply in case of those candidates who have also obtained Ph.D. degree from abroad.

This is to further inform that those presently working as teachers in ad hoc capacity but are not NET qualified shall be given a time period of two years (i.e. four attempts at NET) to qualify in the NET/SLET and during this period of time of two years, colleges, and universities may not fill teaching posts presently held by them on ad hoc basis on regular basis.

Yours faithfully
**(Dr. K.C. Pathak)**
Joint Secretary

Encl : As above : Copy to : The Education Secretaries of all states and union Territories

** FS :P 29 **

वकीली व्यवसाय केला व एक नामवंत विधिज्ञ म्हणून लौकिक प्राप्त केला. ॲड. चांदूरकर १९६४-६५ या काळात नुटाचे उपाध्यक्ष व नंतर संघटनेचे अध्यक्ष होते. प्राध्यापकी सोडून वकीली व्यवसायात गेल्यानंतर सुद्धा त्यांचे प्राध्यापकांना विशेषतः न्यायालयीन कामासंदर्भात विशेष मार्गदर्शन मिळत राहीले. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल संघटनेची ही आमसभा शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

### विषय क्रमांक ५२६ (क) :
### *डॉ. वसंतराव माधवराव पेशवे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव*

डॉ.वसंतराव माधवराव पेशवे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य शंकरराव सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला**:-

डॉ. वसंतराव माधवराव पेशवे यवतमाळ यांचे दिनांक ७ डिसेंबर २०१० रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी हृदय विकाराच्या आघाताने दुःखद निधन झाले. डॉ. पेशवे हे नुटा संघटनेचे आजीवन सदस्य होते. यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयात ते राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक व त्यानंतर बराच काळ प्राचार्य होते. नागपूर व अमरावती विद्यापीठात राज्यशास्त्राचे एक गाढे व चिंतनशील प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख होती. आंतरराष्ट्रीय कायदा, सिमोत्तर दहशतवाद व मानवाधिकार, अमेरीकेचे सुप्रीम कोर्ट इत्यादी विषयावर त्यांची १३ पुस्तके प्रकाशीत झाली आहेत. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात नुटाची ही आमसभा सहभागी आहे.

### विषय क्रमांक ५२६ (ड) :
### *प्रा.वाय.पी.देऊस्कर यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव*

प्रा.वाय.पी.देऊस्कर यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.अनिल सोमवंशी यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला**:-

प्रा.वाय.पी.देउस्कर, जी.बी.मुरारका महाविद्यालय, शेगाव या महाविद्यालयातून सेवा निवृत्त झालेले होते. दिनांक १९.१०.२०१० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. नुटा संघटनेच्या कार्यात त्यांनी सक्रिय योगदान दिलेले होते. एक प्राध्यापक या नात्याने सुद्धा त्यांनी उत्कृष्ट सेवा दिली. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा शोक संवेदना व्यक्त करीत आहे.

*विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १ जून, २००९ ची अधिसूचना राज्यातील संबंधीत विद्यापीठे तसेच संलग्नीत महाविद्यालयांना लागू करणेबाबत*

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,***

**शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/(३५९/०९)विशि-३**

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक : १२ नोव्हेंबर, २००९**

**वाचा** : १) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना F-1-1/2002(PS) Exemp दि. १जून २००९ व केंद्र शासन मनुष्यबळ विकास मंत्रालय, राजपत्र दि. ११ जुलै, २००९

**शासन निर्णय** :- देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भाधीन अनुक्रमांक (i) अन्वये खालील अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. :- (i) अधिसूचना क्र. F-1-1/2002(PS) Exemp दि. १जून, २००९ UGC (Minimum qualifications required for the Appointment and career advancement of Teachers in universities and institutions affiliated to it) (3rd Amendment), Regulation 2009.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाची संदर्भाधीन अनुक्रमांक (i) येथील अधिसूचना केंद्रशासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दि. ११ जुलै, २००९ रोजी राजपत्रात प्रसिद्ध केलेली आहे. यास्तव सदर अधिसूचना केंद्र शासनाच्या **मनुष्यबळ विकास मंत्रालयाने राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून म्हणजे दि. ११ जुलै, २००९ पासून लागू राहील.**

३. उपरोक्त अधिसूचनेतील सर्व तरतूदी राज्यातील सर्व संबंधित अकृषी विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये/संस्थांना लागू आहे. या अधिसूचनेतील सर्व तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे त्यांना अनिवार्य राहील. ही अधिसूचना इंटरनेट (internet) किंवा संबंधित प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २००९१११३१६०९५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

**(रा.गो.जाधव)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

** FS :P 31 **

## ITEM NO. 527 :
## *APPROVAL TO THE AUDITED STATEMENTS :*

**(A) CONSIDERED** and **APPROVED** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2010.

***Notes*** : *(i) The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year was circulated on page 02 & 03 of 2011 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account were placed before the General Body by Dr. A.G. Somwanshi on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 528 :
## *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**Noted** the Statement no. 21 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2010.

***Note :*** *(i) Statement no.21 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2010, was circulated on page 4 of 2011 NUTA Bulletin.*

*(ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2010, was placed before the General Body by Dr. A.G.Somwanshi, on behalf of the Executive Committee.*

### विषय क्रमांक ५२९ :
### *नेटसेट बाबत केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाचे ३ नोव्हेंबर २०१० चे पत्र*

**(अ)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (एमफक्टो) कार्यकारी मंडळाच्या दिनांक ३० जानेवारी, २०११ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत करण्यात आलेला व प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी यांनी मांडलेला पुढील ठराव विचारात घेण्यात आला व **सम्मत करण्यात आला**. :-

***१. केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाचे ३ नोव्हेंबर २०१० चे पत्र***

**१.१** मुळात चार महिन्यात निर्णय घ्यावा असे मा. उच्च न्यायालयाचे

**No.CIM/ 30 : : Dated 15th March 2011**

**CORRECTION**
**in the copy of the Minutes**
**of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 27 th February, 2011 is circulated in this NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Prof.E.H.Kathale, Secretary, NUTA, N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration.

Please send one copy of your letter to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati. 444 604.

**- Dr. E.H. Kathale, *Secretary, NUTA***

सक्त आदेश असतांना ८ - १० वर्षे आयोगाने निर्णय घेतला नाही. नेटसेटच्या बाबतीत हा जो गोंधळ विद्यापीठ अनुदान आयोगाने कृति न केल्यामुळे निर्माण झालेला आहे, त्यावर सारवासारव करण्यासाठी २३ सप्टेंबर, २०१० रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाला जी विनंती केली होती, त्याला अतिशय स्पष्ट व निसंःदिग्ध शब्दात मानव संसाधन विभागाने दिनांक ३ नोव्हेंबर, २०१० रोजी उत्तर दिले असून याबाबतची अंतिम स्थिती त्या विभागाने आता पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. :-

"**The present regulations in force do not have any provisions for exemption of candidates who are not NET/SLET qualified.** In the above circumstances, I am desired to draw your attention to and reiterate the directive issued under Section 20(I) of the UGC, 1956 in making NET/SLET compulsory for teaching positions as a policy relating to national purposes of maintenance of standards of higher education."

**१.२** पुढे मानव संसाधन विभागाने विद्यापीठ अनुदान आयोगाला त्याच पत्रात स्पष्ट शब्दात असेहि कळविले आहे की, "**Therefore, exempting the candidates from NET/SLET requirement, who are going to be appointed or have been appointed after 11th July, 2009 would be violative of the UGC** (Minimum qualifications required for the appointment and career Advancement of teachers for Universities and institutions to it) (3rd amendment) **Regulation,** 2009."

**१.३** "११ जुलै, २००९ नंतर नेमणूका झालेल्या लोकांना 'एक्झमशन' देण्याचे हे काम बंद करा" असे सांगतांना "या तारखेनंतर एक्झमशन देण्याचा तुमचा अधिकार संपुष्टात आलेला आहे." असेहि मानव संसाधन विभागाने स्पष्टपणे विद्यापीठ अनुदान आयोगाला बजावतांनाच 'एक्झमशन'चे ठराव करतांना तुम्ही नेमके काय विसरत आहात, हेहि स्पष्टपणे पुढील शब्दात नमूद केले आहे. :-

"The above mentioned resolution perhaps does not take into account the fact that appointments, If any, pursuant to the date of coming into force of **these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates.**" पुढे विद्यापीठ अनुदान आयोगाला याच पत्रात मानव संसाधन विभागाने असेही सांगितले की "**Similarly, since by Commissions own admission, the regulations are prospective in nature and not retrospective,**" गेली १० - १५ वर्षे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ विद्यापीठ अनुदान

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH, NAGPUR

Misc. Civil Application (Review) No.716 of 2010 (Sandeepkumar s/o. Nandalalji Saraiya .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.812 of 2010 (Ku. Smita G. Ambade and anr. vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.813 of 2010 (Ms Bhagyashree S. Gawate .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.814 of 2010 (Sanjay B. Deshmukh and Ors. vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.815 of 2010 (Tikaram D. Samrit .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.816 of 2010 (Najukram s/o. Dinanath Bankar .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.817 of 2010 (Anil G. Dodewar .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.818 of 2010 (Manmohan S. Bhaisare and Ors. vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.819 of 2010 (Gajanan Bhaurao Jangale .vs. Sant Gadge Baba Amravati University and anr.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.820 of 2010 (Ku. Sheetal R. Gomkar .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.821 of 2010 (Ajit V. Khajgiwale .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.822 of 2010 (Raju Laxman Ade .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.823 of 2010 (Mrs. Arti B. Padole .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.824 of 2010 (Gajanan S. Raut .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.825 of 2010 (Ar vind D. Borkar and Ors. vs. State and Ors. ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.826 of 2010 (Mrs. Pournima H. Rahangdale .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.827 of 2010 (Anant s/o. Atmaram Rindhe .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.828 of 2010 (Anup V. Gumble .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.829 of 2010 (Ms Reema d/o. Khialdas Kamlani vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.830 of 2010 (Sunil s/o. Gajananrao Dhakulkar .vs. Sant Gadge Baba Amravati University and anr.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.831 of 2010 (Prakash s/o. Dhondiba Shrungare .vs. Sant Gadge Baba Amravati University and anr.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.832 of 2010 (Anand s/o. Gurnomal Thadani .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.833 of 2010 (Ashwin s/o. Shivcharan Meshram .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.834 of 2010 (Shrawan B. Kapgate and Ors. vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.835 of 2010 (Ashok s/o. Ramdasji Salame .vs. State and Ors.) ***WITH*** Misc. Civil Application (Review) No.836 of 2010 (Ku. Pramila D. Bhoyar .vs. State and Ors.)

### Coram : S. A. Bobde and A.B.Chaudhari, JJ.
### Date : 29/10/2010.

Heard Mr. A.S.Chandurkar, Adv. for the applicant, Ms Tajwar Khan, Assistant Government Pleader for respondent no.1, Mr.B.G.Kulkarni, Adv. for respondent no. 2 and Mr.S.B.Bangde, Adv. holding for Mr.S.K.Mishra, Assistant Solicitor General of India.

Vide order dt. October 01, 2010, after hearing the learned Counsel for the parties, on the request made by Mr.S.K.Mishra, learned Assistant Solicitor General of India, **the matter was adjourned for filing an affidavit specifically pointing out that the UGC has taken a decision to withdraw the specific exemption granted to the candidates in the meeting dated 23rd February, 2010.**

Today, Mr. Mr.S.B.Bangde, Adv. holding for Mr.S.K.Mishra, Assistant Solicitor General of India has tendered one affidavit sworn by Mr.B.K.Singh, Deputy Secretary, University Grants Commission, New Delhi and invited our attention to para 7 therein. He submits that the present affidavit is in compliance of the said order.

Having gone through the para No.7, we find that the UGC has stated therein that the exemptions granted in its meeting dt. 23.2.2010 vide agenda item No.6.04 and 6.05 have been withdrawn. By this statement, **we are given to understand that there is no exception in the matter of withdrawal of exemptions which were granted in the said 468 th meeting, dt. 23.2.2010.** Recording his statement, we do not find it necessary now to go ahead with the review petition since, in our opinion, the purpose for which the review petition was filed and registered has been achieved. In the result, we dispose of the review application in terms of the above statement made by the U.G.C. No order as to costs.

**JUDGE** **JUDGE**

** FS :P 35 **

आयोगाला वारंवार नेमकी हीच गोष्ट सातत्त्याने सांगत आहे. आता खुद्द मानव संसाधन विभागानेच त्या बाबी सांगितल्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने ही सर्व प्रकरणे कायमची निकाली काढली पाहिजेत.

### *२. सन १९९१ पासून तर ४ एप्रिल, २००० पर्यंत महाराष्ट्रामध्ये झालेल्या नेमणूकांच्या बाबतीत*

**२.१** आज मानव संसाधन विभागाने जी गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाला बजावून सांगितली आहे, तीच गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ३० मार्च, २००३ रोजी पाठविलेल्या एका तपशिलवार निवेदनाद्वारे (यापुढे उल्लेख "संघटनेचे निवेदन" असा) लक्षात आणून दिली होती. त्या निवेदनातील काही महत्त्वाच्या बाबी पुढील प्रमाणे आहेत.

**२.२** नेटसेटच्या पात्रतेच्या अटी कायदेशीररित्या डिसेंबर १९९९ पर्यंत महाराष्ट्रात अमलात आल्या नव्हत्या. याबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक ३० मार्च, २००३ रोजी पाठविलेल्या संघटनेच्या निवेदनामध्ये परिच्छेद २ मध्ये ते अत्यंत नेटकेपणाने मांडले होते, तो परिच्छेद पुढील प्रमाणे :-

"2. LAWFUL INSTRUMENT FOR PRESCRIBING QUALIFICATIONS :

2.1 The Non-Agricultural Universities in Maharashtra, viz, University of Mumbai, SNDT Women's University, University of Pune, Nagpur University, Amravati University, Shivaji University, North Maharashtra University, Dr. Babasaheb Marathwada University and Ramanand Tirth University are governed by the provisions of the Maharashtra Universities Act, 1994. **Section 51(8)**

*सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक/अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कार्यालयीन उपस्थितीसाठी संगणकीय नोंदणी कार्डस प्रणाली (Bio Metric Card System) लागू करणेबाबत*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

*शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/(६८७/१०)विशि-१ : मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. : दिनांक : ५ जानेवारी, २०११*

**वाचा :** सा.प्र.वि.चे परिपत्रक क्र. सीओएम-२००१/प्र.क्र. २९४/साप्रवि/३९ दि. २७ मार्च, २००३.

**प्रस्तावना :** राज्य शासनाच्या सर्व विभागामध्ये तसेच मंत्रालयीन विभागामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती नियमितपणे असावी व त्यावर विभागप्रमुखाचे नियंत्रण असावे, त्या दृष्टीकोनातून संगणकीय नोंदणी कार्डसप्रणाली (Bio Metric Card System) शासनाच्या दि. २ सप्टेंबर, २००२ च्या निर्णयानुसार अनिवार्य करण्यात आली आहे. त्याप्रमाणे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदर कार्डस प्रणालीमध्ये उपस्थिती नोंदविण्यासाठी ओळखपत्र देण्यात आले आहे.

२. सदर प्रकरणी सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयांच्या सर्व संबधित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन उपस्थितीसाठी संगणकीय नोंदणी कार्डस प्रणाली (Bio Metric Card System) लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### *शासन निर्णय*

सदर बाबींचा साकल्याने विचार करुन शासनाने सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक/अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन उपस्थितीसाठी ही संगणकीय नोंदणी कार्डस प्रणाली (Bio Metric Card System) लागू करण्यात येत आहे. सदर बायोमेट्रिक यंत्रणेची अंमलबजावणी खालील निदेशानुसार करण्यात यावी.

(अ) (i) ज्या अकृषि विद्यापीठामध्ये/संलग्नित महाविद्यालयामध्ये संपूर्ण प्रशासकीय कामकाजासाठी संगणकीय यंत्रणा (Computerise System) बसविण्यात आली आहे. अशा विद्यापीठाच्या व संलग्नित महाविद्यालयाच्या संगणक यंत्रणावर लॅन (LAN) बसविण्यात आल्यास ही बायोमेट्रीक सिस्टिम त्वरीत अंमलात आणणे शक्य होईल. त्यासाठी विद्यापीठाने /संलग्नित महाविद्यालयाने फक्त (LAN) अथवा (GPRS) यंत्रणेची जोडणी संबंधीत शासनमान्य कंत्राटदाराच्या माध्यमातून करुन घेणे आवश्यक आहे.

(ii) ज्या अकृषि विद्यापीठामध्ये/संलग्नित महाविद्यालयामध्ये संगणक यंत्रणा बसविण्यात आली आहे. परंतु तेथे (LAN) अथवा (GPRS) कार्ड यंत्रणा बसविण्यात आली नाही अशा ठिकाणी (LAN) अथवा (GPRS) यंत्रणेबरोबरच बायोमेट्रीक सिस्टिम बसविण्यासाठी संबंधित कंत्राटदाराच्या माध्यमातून आवश्यक ती यंत्रणा दरकरार पत्रकानुसार बसवून घेणे आवश्यक आहे.

(iii) ज्या अकृषि विद्यापीठामध्ये/संलग्नित महाविद्यालयामध्ये संगणक यंत्रणा बसविण्यात आली नाही त्या ठिकाणी संगणक यंत्रणा विकत घेण्याबरोबरच GPRS कार्ड व बायोमेट्रीक यंत्रणा शासनमान्य कंत्राटदाराच्या माध्यमातून बसविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तथापि संगणकाची खरेदी विभागाच्या दरकरारानुसार करावी.

(ब) सर्व अकृषि विद्यापीठे/संलग्नित महाविद्यालयामध्ये ही बायोमंट्रीक यंत्रणा बसवितांना ती शिक्षक कक्ष (Staff Room) प्रशासकीय इमारतीचा दर्शनिय भाग तसेच प्राचार्य/कुलसचिवांचे कार्यालय विभाग प्रमुखांचे कार्यालय अशा सुरक्षित व सहजपणे दिसेल अशा ठिकाणी सदर यंत्रणा बसविण्याची दक्षता विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

(क) या संदर्भात सर्व अकृषि विद्यापीठांना असे निर्देश देण्यात येत आहे की, अकृषि विद्यापीठातील शिक्षक संवर्ग/अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीमध्ये सातत्य असावे, त्या दृष्टीकोणातून ही संगणकीय कार्ड नोंदणी प्रणाली (Bio Metric Card System) लागू करण्यात येत असल्याचे त्यांच्या अधिक्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयांना निर्देश देऊन ही यंत्रणा शासनमान्य दरकरारावर उपलब्ध असलेल्या कंत्राटदाराच्या माध्यमातून बसवून घेण्याची दक्षता घ्यावी. या संदर्भात विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्या माध्यमातून सदर योजना तात्काळ अंमलात आणावी व विद्यापीठाच्या /संलग्नित महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक / अधिकारी/ कर्मचारी यांना आवश्यक असलेले ओळखपत्र/कार्डस उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

सदर संगणकीय कार्ड नोंदणी प्रणालीसाठी (Bio Metric Card System) आवश्यक असलेली यंत्रसामुग्री शासनाच्या दरपत्रकावरील (Rate Contract) कंत्राटदाराच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येते. त्यासाठी आवश्यक असलेले हार्डवेअर, संगणक यंत्रणा, लॅन (LAN) जीपीआरएस प्रणाली तसेच सर्व तंत्रज्ञान अगदी माफक दरात उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यासाठी शासनाच्या संकेत स्थळावरील www.mah.gov.in माहितीनुसार आवश्यक ते तपशिल व दरकरारपत्रक उपलब्ध असून बायोमेट्रीक हजेरी प्रणालीकरीता सदर कंत्राट दि. ३० ऑक्टोबर, २०१० रोजी करण्यात आला आहे. या संदर्भात विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालय/संस्थांनी त्यांच्या गरजेनुसार संबंधित कंत्राटदार व पुरवठादारांकडील उपलब्ध तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री निवड करण्यात यावी. सदर प्रणाली कार्यरत करण्यासाठी येणारा संपूर्ण खर्च सर्व अकृषि विद्यापीठाने व संलग्नित महाविद्यलयांनी त्यांच्याकडे चालू आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागवावा.

सदर शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. निरंक, दि. ३.११.२०१० अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०११०१०५१९२८२०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(रा.गो.जाधव)**
शासनाचे उपसचिव,

**of the said Act provides that Recruitment and Qualifications of the teachers of the Universities and the affiliated colleges is to be regulated by Statutes to be made by the Universities.** In case Statutes do not exist or where Statutes exist but they need to be amended, and if in the opinion of the Universities it is likely to take time before new Statutes could be brought into existence or existing Statutes could be amended, Section 14(8) of the Act provides **the Vice Chancellors with powers to issue directions.**

2.2 Section 8(3) of the said Act empowers the State Government to issue **Standard Cod**e for the purpose of securing and maintaining uniform standards by Notification in the official Gazette.

2.3 It may be pointed out that the UGC is fully aware of such provisions in the Universities Act in different States in the country and therefore in all the Regulations/ Notifications that the UGC has been issuing from time to time, the UGC has been emphasizing that it would be necessary for the Universities to make Statutes to implement the UGC Notifications/Regulations."

२.३ संघटनेच्या निवेदनाच्या परिच्छेद ४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आला होता. मुळात नेटसेटची पात्रता परीक्षा लागू करणारे रेग्युलेशन विद्यापीठ अनुदान आयोगाने १९९१ मध्ये निर्गमित केले. त्याच्या स्वरुपाबावत देशभरात अनेक ठिकाणी, विशेषतः खुद्द दिल्ली विद्यापीठातच, याबाबत वाद निर्माण झाला. दिल्ली विद्यापीठाला हायकोर्टाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"**i) Regulations are valid :** Regulations (1991), notified on 19th September, 1991, by the University Grants Commission are valid.

**ii) recommendatory :** The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.

**iii) application prospective :** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective."

२.४ सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा जो निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला त्यानुसार हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा राज्य शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants i.e. candidates) लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे. ही गोष्ट सुद्धा संघटनेच्या निवेदनातून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती.

२.५ सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयामुळे पुढे ४ एप्रिल, २००० चे रेग्युलेशन आयोगाला निर्गमित करावे लागले. त्यानुसार "कोणत्याही व्यक्तीला (No person) नेटसेटची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय विद्यापीठातून व महाविद्यालयातून शिक्षकीय पदावर नेमता येणार नाही" असे स्पष्टपणे नमूद करित असतांनाच विद्यापीठ अनुदान आयोगाला आपल्या या नियमाला एक परंतुक जोडावे लागले. यापूर्वीच नेमल्या गेलेल्या व्यक्तींच्या बाबतीत या परंतुकामध्ये असे ठामपणे नमूद करण्यात आलेले आहे की :- " Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations." यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवडसमितीच्या मार्फत ज्यांची निवड झालेली आहे व त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जे धारण करतात त्यांना नेटसेटच्या पात्रतेचा नियम लागू असणार नाही, असे सन २००० च्या रेग्युलेशनमध्ये स्पष्टपणे नमूद आहे.

२.६ संघटनेने आपल्या निवेदनाच्या परिच्छेद ४.५ मध्ये सन १९९१ ते सन १९९९ या कालखंडात नेमलेल्या अधिव्याख्यात्यांच्याबाबतीत पुढील ५ बाबी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून दिल्या होत्या. :-

"(1) They were selected by duly constituted selection committee;

(2) As candidates, they possessed the then requisite minimum qualification prescribed under the Statute;

(3) All these cases fell under Second Proviso to Clause 2 of the UGC Regulation, 2000;

(4) The decision of the Hon'ble Supreme Court in University of Delhi V/s. Raj Singh & Others applied to them;

(5) The UGC Regulations applied only to candidates who wanted to become Lecturers and not to the Lecturers who were already appointed;"

२.७ सन १९९९ नंतर महाराष्ट्रात नेटसेट सक्तीचे करण्यात आले. त्यानंतरची स्थिती संघटनेच्या निवेदनात पुढील शब्दात मांडण्यात आली होती. :-

"After the Government and the Universities prescribed NET/SET as minimum entry point conditions for Lecturers with a clear direction that no non NET/SET candidate should be appointed as Lecturers, the Universities did not appoint any such candidates as Lecturers and when the colleges appointed such candidates, the Universities have rejected approval of such appointments."

२.८ महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ही गोष्ट लक्षात आणून दिली होती. त्यातील काही गोष्टी पुढे नमुद करण्यात येत आहेत.

**२.९ नागपूर विद्यापीठांच्या मा. कुलसचिवांनी दिनांक १७ डिसेंबर, २००२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविलेल्या** पत्रातील परीच्छेद ६ (एफ) पुढील प्रमाणे आहेः-

"(f) Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, the State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultaneously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument , hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999 in this university area. Advertisements were approved, Selections were made, approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers year after years and continue to be so paid even to-day."

२.१० नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलसचिवांनी जे उपरोक्त तपशीलवार निवेदन दिनांक १७ डिसेंबर, २००२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविले होते, त्याच्या परिच्छेद १२ मध्ये १९९१ ते १९९९ या काळात नेमल्या गेलेल्या शिक्षकांविषयी अशी विनंती केली होती की, :-

" Every teacher mentioned in appendix A is covered by

second proviso of para 2 of the 2000 Regulation. It is the considered opinion of this University that NET/SET qualification is not applicable to the teachers mentioned in the Appendix A as they are covered by second proviso of para 2 of the UGC regulation 2000 and protected by the Supreme Court judgement referred at 2 above, UGC may kindly confirm this view of the University."

**२.११** अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी १० डिसेंबर, २००२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाला एक तपशीलवार निवेदन पाठवून अशाच प्रकारची विनंती केली होती. महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच विद्यापीठांच्या कुलगुरूंनी अशीच विनंती वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोगाला केल्याचे आढळून येते.

**२.१२** सन १९९१ ते सन १९९९ या कालखंडात महाराष्ट्रामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत आता केंद्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम २० (१) अन्वये दिलेल्या निदेशाचा, विद्यापीठ अनुदान आयोगाने आदर करावा व ११ जुलै, २००९ नंतरसुद्धा "एक्झमशन" देण्याचा आपला अधिकार कायमच ठेवला जावा हा हट्ट सोडून द्यावा व मानव संसाधन विभागाने व सर्वोच्च न्यायालयाने नमुद केल्या प्रमाणे १९९१ ते १९९९ च्या काळातील या सर्व नेमणूका सन २००० च्या रेग्युलेशनच्या खंड २ च्या दुसऱ्या परंतुकानुसार नियमित असल्याचे त्या सर्व प्रस्तावांच्या बाबतीत सर्व विद्यापीठांना कळवावे.

### ३. चार एप्रिल, २००० नंतर झालेल्या नेमणूकांच्या बाबतीत

**३.१** एकूणच नेटसेट ग्रस्त शिक्षकांचा विचार करतांना एप्रिल २००० नंतर झालेल्या नेमणूकांच्या बाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थायी समितीने दिनांक ३ व ४ सप्टेंबर, २००८ च्या बैठकीमध्ये नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत काही धोरणात्मक शिफारसी केलेल्या आहेत. त्यात "**With regard to the candidates who had not cleared the NET/ SLET at the time of selection or appointment** and were otherwise found qualified and appointed against existing vacancies on the recommendation of the Selection Committee but were not appointed on a regular basis for lack of NET/SLET clearance and due to non approval from the concerned authorities, the **Committee was of the opinion that if the said appointees have been in continuous service for a period of five years, they will be recommended for exemption from NET/SLET. The Committee further finds that such appointments at the initial stage were only irregular, in the sense, that it is not illegal though the other requirements for regular appointment such as qualifications, selection procedure and existence of vacant posts etc. were duly met and therefore could be regularized.** The committee feels that their appointment was necessitated due to non availability of NET/SLET qualified candidates and their five years service is considered to be sufficient for regularizing their services." अशी एक महत्वपूर्ण शिफारस त्यामध्ये आहे.

**३.२** या शिफारशींवर ७ व ८ ऑक्टोबर, २००८ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. ज्यात एक निर्णय पुढील प्रमाणे आहे :- "With reference to your proposal on the above subject, I am directed to inform you that the matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. **The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had continued service of 5 or more years the NET /SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :-**

(i) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee.

(ii) The constitutional provisions of reservation for SC/ ST etc. are followed in these selections."

**३.३** त्यानंतर उपरोक्त निर्णय अशा ६३७ शिक्षकांच्या (ज्यामध्ये अनेक शिक्षक एप्रिल, २००० नंतर नियुक्त्या झालेले आहेत) बाबतीत नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांना (त्याचप्रमाणे तत्सम शिक्षकांच्या बाबतीत इतर विद्यापीठांच्या कुलसचिवांना) दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविला आहे;

**३.४** Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08,4486/2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणात दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "**So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission's decision in its meeting dated 7th and 8th October, 2008.** If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, **undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC** and also the decision of the Government of India, if any, subsequently taken and applicable to the teacher appointed between the years 1991 to 2006." असा निर्णय दिलेला आहे.

**३.५** (एप्रिल २००० नंतर नियुक्त झालेल्या बिगर नेटसेट शिक्षकांच्या बाबतीत उपरोक्त धोरणात्मक निर्णयानुसार) ७ व ८ ऑक्टोबर, २००८ च्या बैठकीत 'एक्झमशन' देण्याचे जे निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतले ते आजहि अबाधित आहेत. मात्र १२.०८.२०१० च्या बैठकीत तत्सम प्रकरणी घेतलेले निर्णय मधल्या घटना क्रमामुळे निष्प्रभावित झाल्याचे सांगितले जात आहे. मा. उच्च न्यायालयाने ५ नोव्हेंबर, २००८ रोजी दिलेल्या निर्णयातील "**undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC** " या आदेशाप्रमाणे एप्रिल २००० नंतर नियुक्त झालेल्या बिगर नेटसेट शिक्षकांच्या बाबतीत उपरोक्त धोरणात्मक निर्णयानुसार नियमित करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### ४. विद्यापीठ अनुदान आयोगाने करुन ठेवलेला गोंधळ निस्तरण्याचा मार्ग

**४.१** मुळात विद्यापीठ अनुदान आयोगाने, चार महिन्यात निर्णय घ्यावा असे मा. उच्च न्यायालयाचे सक्त आदेश असतांना अनेक वर्षे आयोगाने निर्णय घेतला नाही. शेकडो प्रकरणे अनेक वर्षे पाडून ठेवली.

**४.२** संघटनेनी व शिक्षकांनी अवमान याचिका दाखल केल्यानंतर धोरणात्मक निर्णय न घेता सुरुवातीला एक एक प्रकरण निर्णयात काढण्याची भूमिका घेतली.

**४.३** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक ३० मार्च, २००३ रोजी, अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी दिनांक १० डिसेंबर, २००२ रोजी व नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलसचिवांनी दिनांक १७ डिसेंबर, २००२ रोजी पाठविलेल्या, वस्तुस्थिती लक्षात आणून देणाऱ्या, तपशीलवार निवेदनावर आजपावेतो आयोगाने निर्णय घेतला नाही. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने वारंवार विनंती करुनसुद्धा आपली बाजू मांडण्याची संधी दिली नाही.

**४.५** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असतांना सन २००० च्या रेग्युलेशनच्या खंड २ च्या दुसऱ्या परंतुकांचा विचार सुद्धा न करता अकारणच पहिल्या परंतुकाला लागू करण्याचा अनाठायी हट्ट धरला.

**४.६** कायद्यातील तरतुदींचा वापर करुन केंद्र शासनाने नेटसेट सक्तीचे केल्यानंतर सुद्धा जुन्या प्रकरणी एक्झमशन देण्याचे निमित्त करुन नव्या प्रकरणी सुद्धा एक्झमशन देण्याचा अधिकार आपल्याकडे रहावा यासाठी आयोगाने केविलवाणा प्रयत्न केला.

**४.७** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या धरसोडीच्या धोरणामुळे महाराष्ट्रातील हजारो शिक्षक अकारणच होरपळून निघालेले आहेत. न्यायालयासमोर विद्यापीठ अनुदान आयोगाची सतत फजिती झाली असून ती आणखी होईल हे स्पष्ट दिसत आहे. फार मोठ्या असंतोषाला विद्यापीठ अनुदान आयोगाला तोंड द्यावे लागेल हेही स्पष्ट दिसत आहे. या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी सन १९९१ ते सन १९९९ या कालखंडात महाराष्ट्रामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत आता केंद्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम २० (१) अन्वये दिलेल्या निदेशाचा, विद्यापीठ अनुदान आयोगाने आदर करावा व ११ जुलै, २००९ नंतरसुद्धा "एक्झमशन" देण्याचा

आपला अधिकार कायमच ठेवला जावा हा हट्ट सोडून द्यावा व मानव संसाधन विभागाने व सर्वोच्च न्यायालयाने नमुद केल्या प्रमाणे १९९१ ते १९९९ च्या काळातील या सर्व नेमणूका सन २००० च्या रेग्युलेशनच्या खंड २ च्या दुसऱ्या परंतुकानुसार नियमित असल्याचे त्या सर्व प्रस्तावांच्या बाबतीत सर्व विद्यापीठांना कळवावे. अशी मागणी करण्यात येत आहे. एप्रिल २००० नंतर नेमण्यात आलेल्या शिक्षकांविषयी वर परिच्छेद ३ मध्ये दिल्याप्रमाणे कारवाई पूर्ण करावी असाहि ठराव करण्यात येत आहे.

४.८ दिनांक ३ ते ५ मार्च, २०११ या कालावधीमध्ये सलग तीन दिवस **न्यु दिल्ली येथे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वर्षानुवर्षे निर्णय न घेण्याच्या धोरणाविरूद्ध धरणे आंदोलन** करावे. हा निर्णय विद्यापीठ अनुदान मंडळ, मानवसंसाधन विकास खाते, केंद्र शासन, समविचारी खासदार आणि सर्व राजकीय पक्षांचे नेते मंडळी यांना तातडीने विनाविलंब पाठवावा.

**(ब)** उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत शेवटी सहभागी होतांना अध्यक्षांनी आपल्या भाषणात नेटसेटच्या अटीमुळे विपरितरित्या प्रभावित झालेल्या शिक्षकांच्या बाबतीत सामुदायिक स्तरावरील प्रयत्न महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या व नुटाच्या स्तरावर होत असतांना अशा विपरितरित्या प्रभावित होत असलेल्या प्रत्येक शिक्षकांने व्यक्तीशः पार पाडावयाच्या जबाबदारीबाबत यातील अनेक शिक्षकांचे दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली.

त्यानंतर अध्यक्षांनी आपल्या भाषणात (१) पदाच्या जाहिरातीनुसार अर्ज करण्याची शेवटची तारिख उलटून गेल्यानंतर पात्रतेच्या अटीमध्ये बदल करता येत नाही याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांची माहिती दिली. (२) नागपूर विद्यापीठ क्षेत्रामध्ये तसेच (३) अमरावती विद्यापीठ क्षेत्रामध्ये आज याबाबत काय स्थिती आहे याचे तपशील सांगून (४) व्यक्तीशः प्रत्येक सदस्याने पार पाडावयाच्या कारवाईचे मुद्दे तपशीलवारपणे नमुद केले.

ही जबाबदारी व्यक्तीशः व्यथित शिक्षकानेच पार पाडावयाची आहे. त्याबाबतीत कोणतीहि हयगय किंवा निष्काळजीपणा होता कामा नये याची प्रत्येकाने काळजी घ्यावी असे अध्यक्षांनी नमूद केले.

## विषय क्रमांक ५३० :
## *विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा न होणे*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. दिपक धोटे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव सम्मत करण्यात आला. :-

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांची मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन केल्यास सदर बैठकीत सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती परिच्छेद १ मध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला होता. :-

"केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला. या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल."

(२) राज्य शासकीय कर्मचारी व सर्व स्तरावरील शिक्षकांना (विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक सोडून) थकबाकीचे दोन वार्षिक हप्ते यापूर्वीच अदा करण्यात आलेले आहेत. सेवानिवृत्ती वेतन धारकांना सुद्धा (सेवानिवृत्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक धरुन) अशा थकबाकीचे दोन वार्षिक हप्ते यापूर्वीच अदा करण्यात आलेले आहेत. थकबाकीचा पहिला वार्षिक हप्ता सन २००८ च्या ऑक्टोबर महिन्यात अदा करण्यात आला असून थकबाकीचा दुसरा वार्षिक हप्ता सन २००९ च्या जुलै मध्ये अदा करण्यात आला. थकबाकीचा तिसरा वार्षिक हप्ता या वर्षीच्या जुलैपर्यंत अदा करण्यात येईल असे दिसून येत आहे.

(३) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मात्र आजपावेतो कोणतीही थकबाकी देण्यात आली नसून त्यामुळे या शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. हे लक्षात घेता ८० टक्के थकबाकी ताबडतोबीने अदा करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत थकबाकीचा पहिला व दुसरा हप्ता पुढील एक महिन्यात व तिसरा हप्ता शासकीय कर्मचाऱ्यांसोबत यावर्षी अदा करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

## ITEM NO. 531 :
## *AMENDMENT TO THE CONSTITUTION OF NUTA*

**(A) Considered and approved** unanimously the following Proposal for the amendment to the constitution of NUTA.

### PROPOSAL

(A) In Article IV(b) of the Constitution of NUTA, The following amendments be made, Namely :-

(1) In the first proviso the words "Provided that" be substituted by the words **"Provided firstly that"**

(2) In the second proviso the words "Provided further that" be substituted by the words **"Provided secondly that"**

(3) After the so renumbered second proviso, the following third proviso, be added namely :-

"Provided thirdly that No superannuated member shall be eligible to contest as an office bearer or as a executive committee member."

**Explanation** :- For the purposes of this proviso superannuated member means a member who has attained the age of super annuation as a teacher, as prescribed by legislation or subordinate legislation".

(4) After the so added third proviso the following fourth proviso be added, namely :-

"Provided fourthly that, Notwithstanding any thing in this constitution, A person, who has served as a office bearer of the organization and is a member or an Ex-member of the Legislative Council of Maharashtra either from the teachers or Graduates constituency, shall be an Ex-officio (non-voting) member of the Executive Committee."

(5) After the so added fourth proviso the following fifth proviso be added, namely :-

"Provided fifthly that, One member shall be co-opted by the Executive Committee from amongst the super annuated members."

### *NOTES*

***(1) Article IV(b) of the Constitution of NUTA is as follows :-***

**"ARTICLE IV**

**Organs** of the Association shall be :-

**a) .....**

**b) Executive Committee,** consisting of the office-bearers of the Association (Viz. President, Two Vice Presidents out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area. Secretary, Two Joint Secretaries out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area and Treasurer,) five members to be elected by the General Body and two members to be co-opted by the Executive committee.

**Provided that** after the composition of the Executive Committee as aforesaid, if any district remains unrepresented that district shall be represented by the President of that district unit of NUTA, who shall be Ex-officio member of the Executive Committee.

**Provided further that** the Editor and the Publisher of the NUTA Bulletin shall be the Ex-Officio members of the Executive Committee. Both shall be appointed by the Executive Committee by resolution and shall work during the pleasure of the Executive Committee."

***(2) After the Amendment, if approved, the article IV(b) of the constitution of NUTA will read as under:-***

**"ARTICLE IV**

**Organs** of the Association shall be :-

**a) .....**

**b) Executive Committee,** consisting of the office-bearers of the Association (Viz. President, Two Vice Presidents out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area. Secretary, Two Joint

Secretaries out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area and Treasurer,) five members to be elected by the General Body and two members to be co-opted by the Executive committee.

**Provided firstly that** after the composition of the Executive Committee as aforesaid, if any district remains unrepresented that district shall be represented by the President of that district unit of NUTA, who shall be Ex-officio member of the Executive Committee.

**Provided secondly that** the Editor and the Publisher of the NUTA Bulletin shall be the Ex-Officio members of the Executive Committee. Both shall be appointed by the Executive Committee by resolution and shall work during the pleasure of the Executive Committee."

**Provided thirdly that** No superannuated member shall be eligible to contest as an office bearer or as a executive committee member.

**Explanation** :- For the purposes of this proviso superannuated member means a member who has attained the age of super annuation as a teacher, as prescribed by legislation or subordinate legislation.

**Provided fourthly that** Notwithstanding any thing in this constitution, A person, who has served as a office bearer of the organization and is a member or an Ex-member of the Legislative Council of Maharashtra either from the teachers or Graduates constituency, shall be an Ex-officio (non-voting) member of the Executive Committee.

**Provided fifthly that** One member shall be co-opted by the Executive Committee from amongst the super annuated members."

***(3) Article X of the Constitution of NUTA reads as follows:-***

***"ARTICLE X : Amendment :-*** *a) Proposal to amend the Constitution may come with fourteen clear days notice either from the Executive Committee or from one fifth of the total membership of the Association;*

*b) The Constitution shall stand amended if the proposal is approved by a majority of not less than two thirds of the members present and voting in its General Body Meeting."*

***(4)*** *The Executive Committee approved the above proposal in it's meeting held on 16.01.2011 vide Item No. 19. The same proposal is now included in the agenda of the General Body Meeting for its approval. Dr. E.H.Kathale will move the proposal on behalf of the Executive Committee.*

***(5)*** *Text of the Constitution of NUTA is given on page 2 of the 2000 NUTA Ex file as amended up to date.*

***(6)*** *Text of the Constitution of NUTA is given on page 2 of 78 NUTA Bulletin and reprinted as amended up to date on page 32,33 of 1993 NUTA Bulletin.*

**(B)** पुढील प्रक्रिया तत्परतेने पूर्ण करण्याच्या दृष्टीने विषय क्रमांक ५३१ चे **कार्यवृत्त आजच्या सभेत वाचून कायम करण्यात आले.**

**(C)** नव्याने निवडून येणाऱ्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाल त्या वर्षाच्या १ जानेवारी पासून सुरु व्हावा असा धोरणात्मक निर्णय आमसभेने यापूर्वीच घेतला असून त्या निर्णयानुसार प्रक्रिया पूर्ण करुन किंवा अन्यथा १ जानेवारी २०१२ पासून पदावर येणाऱ्या कार्यकारी मंडळाची निवडणूक **उपरोक्त घटना दुरुस्ती प्रमाणे व्हावी असाहि निर्णय घेण्यात येत आहे.**

**Notes :-** नुटाच्या आमसभेने दिनांक २३.९.१९७९ च्या बैठकीत विषय क्रमांक २ अन्वये सम्मत केलेल्या निवेदनातील परिच्छेद ६ मधील आवश्यक तो मजकूर (शब्दशः) पुढील प्रमाणे आहे. :-

"सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये होणाऱ्या आमसभेमध्ये कार्यकारी मंडळाची निवडणूक व्हावी. त्या सभेच्या कामकाजाचे संचालन जुन्या कार्यकारी मंडळानेच करावे. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात दोनही कार्यकारी मंडळाची संयुक्त बैठक व्हावी. कामाचा भार तपशिलवारपणे नव्या पदाधिकाऱ्याकडे सोपविला जावा. यथास्थिती त्याच्या नोंदी ई-एक्स फाईल मध्ये केल्या जाव्या व नवीन कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा १ जानेवारी पासून सुरु व्हावा असे ठरविण्यांत आले. एकदा ती पद्धती सुरु झाली म्हणजे पुढे येणाऱ्या प्रत्येक कार्यकारी मंडळाचा कार्यकाल १ जानेवारीला सुरु होईल."

NUTA General Body meeting dated 23.9.1979, Item No. 2, Agenda on page 130 of 1979 NUTA Bulletin, Minutes on page 11 of 1980 NUTA Bulletin, Enclosure on page 90 & 91 of 1979 Ex.file.

**विषय क्रमांक : ५३२**
**गणसंख्या :**

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात आलेली आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

**विषय क्रमांक : ५३३**
**सभा व्यवस्थेबद्दल आभार :**

कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

स्वा / **बी.टी.देशमुख** — *अध्यक्ष*

स्वा / **एकनाथ कठाळे** — *सचिव*

*****

---

*महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ नोव्हेंबर, २०१० पासून सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय*

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग***
***शासन निर्णय क्रमांक मभवा-१११०/प्र.क्र.७९/सेवा- ९***
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ : दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१०**

**संदर्भ** :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा-१११०/प्र.क्र.७९/ सेवा-९, दिनांक २२ जून, २०१०

**शासन निर्णय :**

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ नोव्हेंबर २०१० पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ३५ टक्क्यांवरुन ४५ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील.

४. सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. यावर होणारा खर्च 'संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते' या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१०१०२६१५२३०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शि.म.म्हात्रे)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

PR :- (1) NB 2009 P 239 (2) NB 2009 P 232 (3) NB 2009 P 233 (4) NB 2010 P 82 (5) NB 2011 P 29

** AF :P 75 **

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

### Names of Members of the Executive Committee of MFUCTO
### Elected by
### The General Council of MFUCTO in its meeting held in Mumbai on Sunday, 13th March 2011

(1) **The President :** Prof. Dr. Shivajirao Patil (2) **The General Secretary:** Prof. Dr. Tapati Mukhopadhyay (3) **The Treasurer :** Prof. Dr. Vithal More (4) **The Joint Secretaries :** 1.Prof. Sr. S.P. Lawande & 2. Prof. Dr. Vilas Dhone

**Vice President and Executive Committee Members**

**NUTA (Amravati)** : Prof. Dr. Pravin Raghuvanshi, Vice President, **Members :-** Prof. B.T. Deshmukh, Prof. Dr. A.G. Somwanshi, Prof. Dr. Prin. S.T. Sangle

**NUTA (Nagpur) :** Prof. Dr. Sunil Hajare, Vice President, **Members :-** Prof. Dr. E.H. Kathale, Prof. Dr. A.W. Dhage, Prof. Dr. Prakash Hiwarkar

**NMUCTO :** Prof. Dr. Sanjay Sonavane, Vice President, **Members :-** Prof. Dr. B.P. Savakhedkar, Prof. Dr. P.R. Choudhari, Prof. Dr. Sudhir Patil

**PUCTO-PUTA :** Prof. A.T. Sanap, Vice President, **Members :-** Prof. Dr. V.R. NIkam, Prof. Dr. A.S. Jagtap, Prof. Dr. Hemalata More

**SUTA (Kolhapur) :** Prof. Dr. Bharat Jadhav, Vice President, **Members :-** Prof. Dr. Shivaji B. Gaikawad, Prof. Dr. D.R. Khatake, Prof. Dr. N.K. Mulla

**SUTA (Solapur) :** Prof. Dr. S.M. More, Vice President, **Members :-** Prof. Dr. Ranu Kadam, Prof. Dr. D.S. Kasabe, Prof. Dr. S.K. Mathapati

**SNDTUCTA :** Prof. Dr. Rajaram R. Jadhav, Vice President, **Members :-** Prof. Chandrashekar Gawali, Prof. Dr. Vinay Patil, Prof. Dr. Ceena Paul

**BAMUCTO :** Prof. Dr. Ashok Tejankar, Vice President, **Members :-** Prof. Dr. Sujat Quadri, Prof. Dr. Vijay Deshmukh, Prof. Dr. Bappa Mhaske

**SWAMUCTA** : Prof. Uttam Suryavanshi, Vice President, **Members :-** Prof. Dr. B.K. Shinde, Prof. Dr. Suryakant Jogadand , Prof. Dr. Shrtikant Gaekwad

**BUCTU :** Prof. B.R. Salve, Vice President, **Members :-** Prof. Dr. Madhu Paranjape, Prof. G.M. Patil , Prof. Dr. Rohini Sivabalan

*अकृषि विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये सहयोगी प्राध्यापकांच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या १० टक्के पदे प्राध्यापक संवर्गासाठी परिवर्तीत (Convert) करण्याबाबत.*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

***शासन परिपत्रक क्र. एनजीसी २०१०/(४१५/१०)विशि-१ : मंत्रालय,मुंबई-४०० ०३२:दिनांक:२६ ऑक्टोबर, २०१०***

**वाचा** : १) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र. १-३२/२००६-U.II/U.I/(i) दिनांक ३१ डिसेंबर, २००८ चे पत्र.

(२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण क्रमांक एनजीसी-२००९/(२४३/०९)/युएनआय-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.

(३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण क्र. एनजीसी २०१०/(४१५/१०)-विशि-१ दिनांक ३० जुलै, २०१०.

**शासन परिपत्रक**

संदर्भाधीन अन.क्र. ३ येथील दिनांक ३० जुलै, २०१० च्या शासन निर्णयानुसार शासनाने अकृषि विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापकांच्या पदांपैकी १० टक्के पदे रु. ३७४००-६७००० या वेतनश्रेणीत किमान वेतन रु. ४३०००/- व ग्रेड पे रु. १००००/- यावर प्राध्यापकांच्या पदात रुपांतरीत करण्यास काही अटींच्या अधीन राहून मंजूरी दिलेली आहे.

२. सदर दि. ३० जुलै, २०१० च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ५ (iv) मधील तरतूदीनुसार विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण यांना संदर्भाधीन अनु.क्र.१ व २ मधील केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे दि. ३१.१२.२००८ चे पत्र व शासनाचे दिनांक १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दि. ३० जुलै, २०१० च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ५(i) व ५(ii) मधील तरतुदीनुसार त्यांच्या नियंत्रणाखालील अनुदानित अशासकीय पदवी महाविद्यालयांना प्राध्यापकांची किती पदे अनुज्ञेय आहेत हे निश्चित करावयाची आहेत.

३. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, गुणवत्तेवर आधारीत व सरळ भरतीने/ प्रतिनियुक्तीने भरावयाच्या प्राध्यापकांची पद संख्या निश्चित करताना अपूर्णांकित आकड्यांचे पूर्णांकीत आकड्यात रुपांतर कशा पद्धतीने करावयाचे आहे त्यावर स्पष्टीकरण, शक्यतो उदाहरणासह होणे आवश्यक आहे.

४. त्यास अनुसरून सहयोगी प्राध्यापकाच्या पदाचे प्राध्यापकाच्या पदात रुपांतर करताना अपूर्णांकांना पूर्णांकात कसे परिवर्तीत करावयाचे आहे त्यावर खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

टप्पा १ :- संबंधित महाविद्यालयाच्या एकूण सहयोगी प्राध्यापकांची मंजूर पदे निश्चित करा (अ)

टप्पा २ :- (अ) चे १० टक्के निश्चित करा, जो पूर्णांकात असेल किंवा नसेल ... (ब)

टप्पा ३ :- गुणवत्तेवर आधारित पदोन्नतीचा कोटा खालीलप्रमाणे काढा : (ब) X 0.75 = (क)

जर (क) पूर्णांकात नसेल तर त्याला पुढील पूर्णांकात परिवर्तीत करा जो गुणवत्तेवर आधारित पदोन्नतीचा कोटा असेल (क-१)

टप्पा ४ :- सरळ भरतीने/प्रतिनियुक्तीने भरावयाचा पदोन्नतीचा कोटा खालीलप्रमाणे काढा :- (ब) X 0.25 = (ड)

जर(ड)पूर्णांकात नसेल, तर त्याला पुढील पूर्णांकात परिवर्तीत करा. जो सरळसेवा भरतीने/प्रतिनियुक्तीने भरावयाचा पदोन्नतीचा कोटा असेल. (ड-१)

वर स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित महाविद्यालयासाठी गुणवत्तेवर आधारित पदोन्नतीची पदे (क-१) आणि सरळ सेवा भरतीने/प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदोन्नतीची पदे (ड-१) प्रमाणे असतील.

५. वरील स्पष्टीकरण खालील तक्त्याद्वारे अधिक स्पष्ट करण्यात येत आहे.

| उदा-हरण | सहयोगी प्राध्यापकाची मंजूर पदसंख्या | मंजूर सहयोगी प्राध्यापक पदांच्या १० टक्के | गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाचा कोटा (७५ टक्के) | | सरळसेवेने/ प्रतिनियुक्तीने भरावयाचा कोटा (२५ टक्के) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | काढल्या प्रमाणे | पूर्णां कात | काढल्या प्रमाणे | पूर्णां कात |
| I | ०८ | ०.८० | ०.६० | १ | ०.२० | १ |
| II | १२ | १.२० | ०.९० | १ | ०.३० | १ |
| III | १६ | १.६० | १.२० | २ | ०.४० | १ |
| IV | २० | २.०० | १.५० | २ | ०.५० | १ |
| V | २४ | २.४० | १.८० | २ | ०.६० | १ |
| VI | २६ | २.६० | १.९५ | २ | ०.६५ | १ |
| VII | २७ | २.७० | २.०२५ | ३ | ०.६७५ | १ |
| VIII | ३० | ३.०० | २.२५ | ३ | ०.७५ | १ |
| IX | ३६ | ३.६० | २.७० | ३ | ०.९० | १ |
| X | ४० | ४.०० | ३.०० | ३ | १.०० | १ |
| XI | ४१ | ४.१० | ३.०७५ | ४ | १.०२५ | २ |
| XII | ४८ | ४.८० | ३.६० | ४ | १.२० | २ |
| XIII | ५६ | ५.६० | ४.२० | ५ | १.४० | २ |
| XIV | ६० | ६.०० | ४.५० | ५ | १.५० | २ |

६. वरील प्रमाणे विभागीय सह संचालकांनी त्यांच्या नियंत्रणाखालील प्रत्येक अनुदानित पदवी महाविद्यालयासाठी गुणवत्तेवर आधारित व सरळसेवेने/ प्रतिनियुक्तीने भरावयाच्या प्राध्यापकांच्या पदांची संख्या निश्चित करुन ते, इतर अनुषंगिक सूचनांसह संबंधित महाविद्यालयांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यास कळवावे व त्याची प्रत संबंधित विद्यापीठांना पाठवावी.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.on या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्यांचा संगणक क्रमांक २०१०१०२६१५४९४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(विकास तु. कदम)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

*** FS :P 43 ***

# ON UNITY OF MASS ORGANIZATIONS

**Prof. Mrinmoy Bhattacharyya**

Ex. General Secretary, FISE, AIFUCTO

A leading characteristic of democracy is that it allows, in fact promotes, **formation of mass organizations by individual initiative.** Right from the time of American Revolution and formation of United States of America. The Rights of man vis-a-vis the state and the church have been incorporated in one form or another as part of the constitutions of democratic governments all over the world, French Revolution further strengthened this trend. Unification of small principalities in Europe and formation of national states like Germany and Italy further strengthened the necessity of recognition of rights of citizens. **Monarchy and dictatorship in one or other form was rejected slowly but inevitably.** Collapse of colonialism and the end of second world war gave birth to hundreds of new states in all the continents. Many of the new states did not have any precedent of being governed by codified laws and constitutions. But they too adopted democratic constitutions and swore by rule of law and rights of citizens. By the end of 20th century democracy at least on paper became the most popular and acceptable form of government, **Right to form organizations and freedom of speech and publication became accepted as a fundamental condition of continuation of democratic governance.** It is another matter that in most of the developing countries democracy could not take root. Military dictatorship or coup-de-tat or tribal insurgency extinguished the tentative flicker of democracy. Yet, so popular has been the idea of government by consent that any departure from democratic government became unacceptable. **Almost all dictators promise to restore democracy as early as possible.**

However when we study carefully functioning of democracy in different countries we clearly find that many countries have dispensed with many democratic norms and customs and they retain only the name sake democracy. We shall not discuss here all aspects of a healthy functioning democratic state. We shall consider only one i.e. the **right to form and conduct mass organization democratically and transparently without interference from the state.**

Mass organizations can be of many types and can have widely different aims and objectives. A mass organization can have widely different coverage from local to international. It may be unitary or federal in composition. It may or may not have formal linkage with state. Similarly, it may or may not have legal entity enabling it to possess property and the right to sue and be sued against. **The membership** may be periodic like annual or only life term. Membership may be restricted to a particular category of people or profession and it may cease with transfer, retirement or retrenchment on loss of status in the profession. On the other hand, membership may be highly restricted making the original members practically owners and controllers of the institution. However, there is a common thread which characterizes such institutions without exception. They perform such functions and meet such needs of the people which can not be looked after by the state adequately and satisfactorily, Mass organizations thus are complementary to the government in terms of service rendered to the people. There are services which can be provided only by collectives and not individuals and the state can not provide them satisfactorily. Such services are tailor-made for mass organizations. Trade unions, professional associations and teachers' trade organizations are such organizations. **Some of us have spent our entire life in running these organizations. We have now retired from service and also retired from Offices held in mass organizations.** While working at our place of work, class rooms and thereafter working in union offices, we were much too busy to ponder over in depth the characteristics of these organizations and their contribution in young democratic states, Now after retirement we have time and wide experience to think in depth about the organizations we ran and led over long periods.

Personally speaking, my first job was in a higher secondary school in 1960 as a fresh hons, graduate to teach Economics at the higher secondary level. In 1963 I joined a degree college as a Lecturer. I served three colleges. In all I served two schools and three colleges and I got dismissed from 1 school and 1 college. I was wrongfully victimized by the management in both. In the last college where I worked for more than thirty years and retired there from, charges were framed against me for dismissal. But this time the management failed. I was by this time experienced and I received support of teachers' Union at the state level. My colleagues at the college were also united. So, I became a teacher leader and rose from one office to the other, from college to state, and from state to national level, then from national level to international level.

Unions and associations of working people of different industries are protected by various acts passed by parliament and assemblies. **Industrial Disputes Act and Trade Union Act in our country provide the main legal structure.** Some teachers' unions in our country are formed and registered as unions. Others are registered associations registered under Registration of Societies Acts. There are other pieces of legislation also. Most of them were enacted in response to teachers' and workers' demand. West Bengal Non-govt. College Teachers' Service Security Act is a case to cite. This act was passed in west Bengal Assembly to nullify

*विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजात मराठीचा वापर करण्याबाबत*

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,***

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१०/प्र.क्र.३५९/१०)विशि-३**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२:दिनांक:४ नोव्हेंबर, २०१०**

**वाचा** : १) शासनाचे पत्र क्र. संकीर्ण २००८/(१४१/०८)विशि-४ दिनांक : २०.०८.२००८

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मभावा १०८६२/४३४/प्र.क्र.१६१/८६/विस-ब, दि, १८.७.१९८६

**शासन परिपत्रक :** कार्यालयीन कामकाजात मराठीचा वापर करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दि. १५.११.२००७ च्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत. सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करा वे असे संदर्भाधिन पत्रान्वये सर्व विद्यापीठांना कळविण्यात आले आहे. विद्यापीठाचा कारभार मराठी भाषेतून व्हावा या संदर्भात विधान परिषदेतही आश्वासन देण्यात आले आहे. सदर बाब विचारात घेऊन विद्यापीठांचा कारभार मराठीतून करण्याबाबत याद्वारे सर्व अकृषि विद्यापीठांना सूचना देण्यात येत आहे.

शासन व्यवहारात संयुक्तीक कारण नसतांना मराठी वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यां विरुद्ध कारवाई करण्याबाबत संदर्भाधिन येथील अ.क्र. २ अन्वये आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार विद्यापीठ कामकाजात मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्याविरूध्द कारवाई करण्याची तरतुद विद्यापीठ नियमांत करण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांनी विचार करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१०११०४१४२४१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(प्र.गि.कानडे)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

** AF :P 73 **

the vindictive and wrongful dismissal of teachers by the management of Kamarpukur College. **Unions and associations of working people including teachers are usually open and they function democratically.** Their leading functionaries are elected by general members directly or indirectly through electoral colleges for a definite period and often deprived of the right to be elected beyond a certain number of terms, usually 2/3 , to avoid the danger of growth of vested interest. These organizations function democratically and follow the balanced policy of struggle and cooperation. **Their strength comes from their nonpartisan and all-in-collusive composition. No government can afford to disregard the principled demand of these organizations.** Functionaries of these organizations some times have loyalty to one or other political party. **But the decision in the union is taken on the basis of consensus.**

However, there are also instances of totally partisan organizations. They may be called frontal organizations of those political parties. Trade unions state-wise, industry-wise or firm-wise. **Such unions are often formed by political parties.** Important political leaders who may not have any direct connection with that industry or trade are usually made leaders of these organizations. Obviously, they are nominally elected but actually nominated by the sponsoring political parties, Such unions or mass organizations are so run that their members may join the sponsoring parties. Naturally if some one harbours any ambition to be in important offices in such unions he has to be also in the good book of the party-leader who looks after this front on behalf of the mother party. On the other hand, popularity in the mass organization may help to climb higher position in the political party.

**Political parties are the principal players in democracy.** They adopt their own political program for the country and campaign for support among people. This campaign is intensive at the time of election. But serious political parties do so even in non-election time. Partisan unions throw up trained political campaigners. **Unions are thus schools to prepare political leaders. This is not a small job.**

**But if we consider the interest of the profession or industry in general, multiplicity of unions and partisan unions can only spawn real unions and cause harm in stead of good.** When their own political party is in power, partisan unions cannot speak out or conduct movement and agitations even when the state policy is wrong. On the other hand, if an opponent political party comes to power it may offer only left handed cooperation even when the party in power may be pursuing the correct policy.

**Before discussing the advantages and disadvantages or merits and demerits of an all inclusive union. I should aver that almost all my life I have worked in united all inclusive unions and I am a firm supporter of this type of mass organizations.** Its advantages are much too many and overwhelming. And this is the form of the future. A trade and a profession has its own characteristics and they define the tradesmen or the professional. An economy and a society runs smoothly when all the trades are performing smoothly. I strongly believe that when a tradesman or a professional acts well he/she is performing a great service. Even without knowing and doing nothing extra he/she is rendering valuable social service. **At times some factors usually external to the trade/profession create impediments to smooth working of the trade. The main function of the concerned trade union is to fight for their removal. A non-partisans all inclusive union is likely to be more effective in such a struggle as compared to a divided, sectional or partisan union.**

By virtue of its inclusive character the leaders whichever party or group they may belong to have to be tolerant of other opposing opinions. 'This reduces social tension and incrimination. It should be understood that mental calmness and equanimity enable all to appreciate beauty and truth of the highest order. **Occupying public offices can bring great satisfaction in such a state of mind and also organization. On the contrary in partisan organization mutual recrimination disturbs mental peace and generates tension and unhappiness all around.**

Politically homogenous organizations prevent growth of self confident courageous leaders. Continuation in leadership in such organizations depends on being in the good book of party-bosses, and not so much on serving the professional interest both monetary and otherwise. Often it creates vested interest and continuation of leadership for too long a period. Younger cadres get frustrated creating dissension and acrimony. **Trust of common members on the leadership gets weakened because even common members know that crucial decisions are taken not by organizational leaders but by the political boss working behind the screen. Such a situation devalues mass organizations.** Really talented persons do not want to join such leadership making room for sycofants and spine-less functionaries.

Partisan organizations do not allow free and frank debates or contest of ideas. Necessary condition for a free and frank debate is that no one would be victimized for holding and articulating non-official opinions. Free and frank exchange of ideas is the precondition of a democratic mass organization. **A multi-party inclusive organization makes it imperative that the leadership listens to the opposing party or the minority party.** In some such organizations the very constitution provides that opposition can not be decimated. In such organizations change in leadership both personal and political takes place regularly and smoothly. The very idea that to day's opposition may become the treasury party ensures that each behaves responsibly and cautiously. **This also ensures transparency and honesty in organizational and financial conduct. In their activities such organizations invariably pursues the path of a judicious amalgam of struggle and cooperation. Both are equally important.**

**- Courtesy "Teachers Movement"**
Vol. 13, Issue 2, February 2011
P.P.2-4

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting :**05.04.2011**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,.........................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................